13 DEC 2024

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पुण्यातील 'दे आसरा फाऊंडेशन'शी शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार

- विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता जागृतीसाठी होणार फायदा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाशी झालेल्या सामंजस्य करारामुळे दे'आसरा फौंडेशन आता येथील सृजनशील युवकांमध्ये उद्योजकता विकास आणि सामाजिक विकासाशी जोडली जात आहे, याचे समाधान वाटते, असे मत उद्योजक तथा पुण्याच्या दे'आसरा फौंडेशन"चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आनंद देशपांडे यांनी व्यक्त केले.

सर्वसामान्यांमध्ये उद्योजकता विकासासाठी सर्वोतोपरी सहकार्य करणाऱ्या दे'आसरा फौंडेशन"सोबत शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार झाला. त्यावेळी डॉ. देशपांडे बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि दे'आसरा फौंडेशन यांच्यादरम्यान सामंजस्य करार प्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. आनंद देशपांडे. सोबत डॉ. आनंद गोडसे, मनिषा तपस्वी, आशिष पंडित, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, अविनाश भाले.

डॉ. देशपांडे म्हणाले, नव्या पिढीने अत्यंत सजगपणाने कौशल्ये तसेच वैविध्यपूर्ण कामे करण्याकडे कल दर्शविला पाहिजे. सातत्यपूर्ण नवनवे शिक्षण, प्रशिक्षण आणि जगाकडे नव्याने पाहिले पाहिजे. यादृष्टीने सर्वसमावेशक उपक्रम, विद्यार्थी प्रशिक्षण आणि प्रशिक्षकांना प्रशिक्षण राबवण्यासाठी दे'आसरा फौंडेशन विद्यापीठास मदत करेल.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठात सामाजिक समावेशन केंद्रासह दोन बँकांची अध्यासने आहेत. त्यामुळे सामंजस्य करारांतर्गत विविध उपक्रम राबवण्यासाठी आवश्यक बाबींची पूर्तता करून विद्यार्थ्यांना उद्योजकतेविषयी अवगत करण्यासाठी प्रयत्न करता येतील.

करारावर कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आणि आशिष पंडित यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी डॉ. श्रीकृष्ण महाजन, विद्यापीठाच्या इनोव्हेशन, इनक्युबेशन आणि लिंकेजेस केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर, अविनाश भाले, डॉ. आनंद गोडसे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2024
सकाळ

# डॉ. संभाजी खराट यांना विद्यापीठात आदरांजली

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १२ : शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे सेवानिवृत्त माहिती उपसंचालक डॉ. संभाजी खराट यांना शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागातर्फे आदरांजली वाहण्यात आली. डॉ. खराट यांचा पत्रकारिता विभागाशी अनेक वर्षांचा ऋणानुबंध होता. त्यांच्या निधनाने पत्रकारिता व जनसंपर्क क्षेत्राशी संबंधित घटकांची आणि सत्यशोधक चळवळीची मोठी हानी झाल्याच्या भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

अधिविभागप्रमुख डॉ. निशा पवार म्हणाल्या, 'डॉ. खराट यांनी अनेक वर्तमानपत्रांत विविध पदांवर काम केले. सत्यशोधक जलशांवर त्यांनी संशोधन केले. शिवाजी विद्यापीठातील पत्रकारिता विभागात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी ते सातत्याने येत राहिले.'

जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर म्हणाले, 'डॉ. खराट यांनी सत्यशोधक पत्रकारितेवर संशोधन करून नव्या पिढीसाठी मौलिक काम केले आहे. निवृत्तीनंतरही त्यांनी हे संशोधन सुरूच ठेवले होते. त्यांच्या निधनाने सत्यशोधक चळवळीची मोठी हानी झाली आहे.'

डॉ. शिवाजी जाधव यांनी शोकप्रस्ताव मांडला. पुणे येथील फिल्म ॲन्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूटचे डॉ. प्रसाद ठाकूर, शैलेश कोरे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2024
लोकमत

# डॉ. संभाजी खराट यांना आदरांजली

कोल्हापूर : महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे सेवानिवृत्त माहिती उपसंचालक डॉ. संभाजी खराट यांना शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागातर्फे गुरुवारी श्रद्धांजली वाहण्यात आली. डॉ. खराट यांच्या निधनाने पत्रकारिता व जनसंपर्क क्षेत्राशी संबंधित घटकांची तसेच सत्यशोधक चळवळीची मोठी हानी झाल्याच्या भावना यावेळी व्यक्त केल्या. शोकसभेत अधिविभागप्रमुख डॉ. नीशा पवार, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. शिवाजी जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी पुणे येथील फिल्म अँन्ड टेलिव्हिजन इस्टिट्यूटचे डॉ. प्रसाद ठाकूर, शैलेश कोरे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
13 DEC 2024 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'टीव्ही माध्यमात उत्तम करिअरच्या संधी'

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

टेलिव्हिजन माध्यम सर्वदूर पोहोचले आहे. या माध्यमाच्या विस्ताराबरोबरच यात अनेक तांत्रिक बदल होत आहेत. या बदलाची नोंद घेऊन कालसुसंगत, तंत्रस्नेही धोरण राबविल्यास या क्षेत्रात उत्तम करिअर करता येऊ शकते, असे मत पुणे येथील फिल्म अॅन्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूटचे डॉ. प्रसाद ठाकूर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम अॅन्ड मास कम्युनिकेशन विभागातील टेलिव्हिजन प्रोडक्शन विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार होत्या.

डॉ. ठाकूर म्हणाले, माध्यमांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर कमालीचा वाढला आहे. तंत्रज्ञान स्वीकारणे आणि त्यानुसार आपल्यात बदल करणे



कोल्हापूर : पुणे येथील एफटीआयआयचे डॉ. प्रसाद ठाकूर यांचे शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेत स्वागत करताना डॉ. निशा मुडे-पवार. सोबत डॉ. शिवाजी जाधव, डॉ. आलोक जत्राटकर, शैलेश कोरे.

अपरिहार्य आहे. माध्यमांच्या ग्राहकांच्या गरजाही बदलत आहेत. या सर्वांचा विचार करून टीव्ही माध्यमात आले पाहिजे. विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी मार्गदर्शन केले. मुद्रीत, इलेक्ट्रॉनिक तसेच वेब माध्यमांचा त्यांनी आढावा घेतला. कृत्रिम बुद्धीमत्तेसह आलेले सर्वच तंत्रज्ञान सकारात्मक पद्धतीने वापरून तंत्रज्ञानावर स्वार झाले पाहिजे, असे त्यांनी सांगितले शैलेश कोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. ऋतुराज दाभाडे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2024
सकाळ

# विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी पोषक वातावरण हवे : डॉ. पाटील

## शिक्षणशास्त्र अधिविभागात कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १२ : विद्यार्थ्यांमध्ये अध्यापन शास्त्रीय कौशल्ये वाढविण्यासाठी सर्वांगीण शिक्षण महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांमध्ये बोधनिक कौशल्यासह जीवन कौशल्ये वाढविण्यासाठी वर्गाबरोबरच त्याच्या पलीकडे अध्ययन पोषक वातावरण निर्माण केले पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागात प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानाअंतर्गत ९ आणि १० डिसेंबरला प्रकल्प व परिदृश्य अध्ययनावर अध्यापन शास्त्रीय कार्यशाळा घेण्यात आली. त्यामध्ये प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेतील प्रकल्प आधारित आणि परिदृश्य आधारित अध्ययनासंबधी त्यांनी विविध दाखले व उदाहरणे सांगून शिक्षकांची बदलती भूमिका स्पष्ट केली.

सावित्रीबाई पुणे विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागामधील प्रा. डॉ. वैभव जाधव यांनी प्रकल्प पद्धतीचे महत्त्व व पाठनियोजनाचे मार्गदर्शन केले. डॉ. गीता शिंदे यांनी परिदृश्य आधारित अध्ययनाचे तात्त्विक अधिष्ठान व त्यावरील कृतीयुक्त पाठनियोजन व सादरीकरण झाले. डॉ. रूपाली संकपाळ यांच्याह इतर सहयोगी प्राध्यापक बी.एड-एम.एड, एम.एड व बी.एस्सी. बी. एड अभ्यासक्रमाचे विद्यार्थी उपस्थित होते. अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी स्वागत केले. प्रास्ताविकामध्ये डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी कार्यशाळेचा हेतू विशद केला. प्राची पाटील, प्रियांका सूर्यवंशी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुप्रिया पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2024
सकाळ



कोल्हापूर : महावीर महाविद्यालयात मराठी नवसमीक्षा-उदगम आणि विकास या ग्रंथाचे प्रकाशन ज्येष्ठ समीक्षक प्रा. डॉ. सुधीर रसाळ आणि कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून डॉ. रघुनाथ कडाकणे, बी. एम. हिर्डेकर, रणधीर शिंदे, एच. व्ही. देशपांडे, आर. पी. लोखंडे आदी.

# ‘मराठी नवसमीक्षा’ ग्रंथ लेखक, समीक्षकांसाठी महत्त्वाचा

## प्रा. डॉ. सुधीर रसाळ; महावीर महाविद्यालयात प्रकाशन

कोल्हापूर, ता. १२ : इंग्रजीतील नवसमीक्षेचा विचार समजावून घेऊन मराठी समीक्षेवर त्याचा कसा प्रभाव पडला. मराठीतील लेखक, समीक्षकांनी हा विचार कशा स्वरूपात स्वीकारला, याची साकल्याने माहिती देणारा महत्त्वाचा ग्रंथ म्हणून डॉ. एच. व्ही. देशपांडे यांच्या मराठी नवसमीक्षा-उदगम आणि विकास या ग्रंथाचे स्वागत करतो, असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक प्रा. डॉ. सुधीर रसाळ यांनी केले.

येथील महावीर महाविद्यालयात या ग्रंथाच्या प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. लेखक, प्राचार्य डॉ. देशपांडे यांनी सद्य:स्थितीत विद्यापीठाच्या सहायाने तंत्रज्ञानाच्या भाषेचा साहित्य अभ्यासात एकत्र वापर करून विविध भारतीय भाषांमधील समीक्षा विचार संकलित व्हावा. अशी अपेक्षा व्यक्त केली.

डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी या ग्रंथाने समीक्षा अभ्यासातील मोठी उणीव दूर केल्याचे सांगितले. डॉ. रघुनाथ कडाकणे यांनी इंग्रजी-मराठी समीक्षेचा १९८० ते २०२० अखेरचा तुलनात्मक अभ्यास या ग्रंथात करण्यात आल्याचे सांगितले. डॉ. रणधीर शिंदे यांनी मराठी नवसमीक्षा ग्रंथाचा परिचय करून दिला. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी मराठी समीक्षा क्षेत्रात अधिक अभ्यास करण्याच्यादृष्टीने विद्यापीठाने पावले उचलली असल्याचे सांगून अभ्यासकांनी पुढे येण्याचे आवाहन केले. प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे यांनी समारोप केला. ॲड. प्रवीण देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. ॲड. सुरेश देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले.

### डॉ. रसाळ यांच्याकडून आश्चर्य व्यक्त

▪ लेखकाच्या सर्वांगीण अभ्यासासाठी त्याची पुस्तकेच नव्हे, तर पत्रव्यवहार संबंधित सर्व कागदपत्रे जतन करणे आवश्यक असते; परंतु या विषयीची जागरुकता फारशी दिसत नाही. बा. सी. मर्ढेकर हे अनुभवाशी प्रामाणिक असलेले कवी होते. भालचंद्र नेमाडे देशीवादाचा पुरस्कार करताना दुसरीकडे शैलीशास्त्र शिकविण्याचाही आग्रह धरतात, यावर डॉ. रसाळ यांनी आश्चर्य व्यक्त केले.


जनसंपर्क कक्ष
13 DEC 2024 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'ऑन स्क्रिन मार्किंग'बाबत शिक्षक, कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १२ : हिवाळी सत्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे ऑन स्क्रिन मार्किंग पद्धतीने मूल्यमापन करण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठाने घेतला आहे. त्याबाबत प्राचार्य, शिक्षक, कर्मचाऱ्यांना विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळातर्फे मंगळवारी मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात ऑन स्क्रिन मार्किंग पद्धतीने उत्तरपत्रिका मूल्यमापन करण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील महाविद्यालयांसाठी मार्गदर्शनपर कार्यशाळा झाली. त्यात विद्यापीठातील अधिविभागप्रमुख,



महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, दूरशिक्षण विभागातील संचालक आणि शिक्षक, तसेच परीक्षा विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. त्यांना तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील, तसेच अधिविभागातील मूल्यमापनाच्या अनुषंगाने पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या शिक्षकांना आवश्यक ऑनलाईन संगणक प्रणालीची माहिती देण्यात आली.

अध्यक्षस्थानी परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, तर व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील प्रमुख उपस्थित होते. या पद्धतीमुळे परीक्षांच्या उत्तरपत्रिकांच्या मूल्यमापनाचे कामकाज बिनचूक होऊन निकाल लवकर लागण्यास मदत होईल, असे डॉ. जाधव यांनी सांगितले.

ऑन स्क्रिन मार्किंग संगणक प्रणालीद्वारे उत्तरपत्रिकांचे मूल्यमापनाचे कामकाज कशा पद्धतीने होईल याचे सादरीकरण श्रीधर लोका यांनी केले. कॅप विभागाचे उपकुलसचिव दिपक अडगळे यांनी प्रास्ताविक केले. अधीक्षक एन. डी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सहायक कुलसचिव अनिल भेंडेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2024
लोकमत

# विद्यापीठात ऑन स्क्रिन मार्किंग मूल्यमापन कार्यशाळा उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात ऑन स्क्रिन मार्किंग मूल्यमापन कार्यशाळा उत्साहात झाली. राजर्षी शाहू सभागृह येथे आयोजित कार्यशाळेसाठी अधिविभागप्रमुख, महाविद्यालयांतील प्राचार्य, शिक्षक, दूरशिक्षण विभागातील संचालक, शिक्षक, परीक्षा विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव अध्यक्षस्थानी होते. ऑक्टोबर /नोव्हेंबर २०२४ या हिवाळी सत्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेचे ऑनस्क्रिन मार्किंग पद्धतीने मूल्यमापन होईल. त्यासाठी आयोजित कार्यशाळेत तज्ज्ञांकडून शिक्षकांना आवश्यक ऑनलाइन संगणक प्रणालीची माहिती दिली. या कार्यशाळेस प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. श्रीधर लोका, दीपक अडगळे, एन. डी. पाटील, अनिल भेंडेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2024
सकाळ

# डॉ. यशवंत थोरात यांचे आज विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील पी. जी. डिप्लोमा इन इंटरनॅशनल रिलेशन अँड सिक्युरिटी स्टडीजतर्फे उद्या, शुक्रवारी सकाळी अकरा वाजता ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंत थोरात यांचे 'भारत-बांग्लादेश संबंध' या विषयावर विशेष व्याख्यान होणार आहे. राज्यशास्त्र अधिविभागातील या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आणि पत्रकार श्रीराम पवार, तर राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. प्रकाश पवार, राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. रवींद्र भणगे प्रमुख उपस्थित असणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2024
लोकमत

# ३५ विद्यार्थ्यांनी घेतली देवनागरी स्वाक्षरीची शपथ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** थोर कवी चिन्नास्वामी सुब्रमण्यम भारती यांच्या जयंतीनिमित्त बुधवारी शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागात भारतीय भाषा दिन उत्साहात साजरा केला. यावेळी देवनागरीत स्वाक्षरी मोहीम हाती घेतली. यावेळी ३५ विद्यार्थ्यांनी देवनागरीमध्ये स्वाक्षरी करत येथून पुढे देवनागरीमध्येच स्वाक्षरी करण्याचा संकल्प केला. विद्यार्थी गुलामगौस तांबोळी, हर्षिता माने, महेक नदाफ व सुप्रिया पवार यांनी मनोगत व्यक्त केले.

हिंदी विभाग प्रमुख तृप्ती करेकट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेतला. भारतीय भाषा महोत्सवाचे महत्त्व हिंदी विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. प्रकाश मुंज यांनी सांगितले, भारतीय भाषा दिनाची संकल्पना डॉ. संतोष कोळेकर यांनी स्पष्ट केली. डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. प्रकाश निकम यांनी सहभाग घेतला.

13 DEC 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# न्यू कॉलेजला जनरल चॅम्पियनशिप

## गडहिंग्लजमध्ये आयोजित जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

येथील शिवराज महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यातील ३९ महाविद्यालयांतून १९९ विद्यार्थी सहभागी झाले होते. कोल्हापूरच्या न्यू कॉलेजने बाजी मारत जनरल चॅम्पियनशिप मिळविली.



**गडहिंग्लज : जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरणप्रसंगी प्रा. किसनराव कुराडे, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. टी. एम. चौगले, डॉ. आर. एच. अतिग्रे आदी.**

विजेत्यांना शिवराजचे संस्थाध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. टी. एम. चौगले, संचालिका प्रा. बिनादेवी कुराडे, डॉ. आर. एच. अतिग्रे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांनी स्वागत केले. स्पर्धेचे समन्वयक डॉ. डी. एच. दगडे, उपाध्यक्ष दिग्विजय कुराडे, डॉ. ए. व्ही. धुळे, डॉ. जे. बी. यादव यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन कार्यक्रम झाला.

ह्युमॅनिटी, लँग्वेज आणि फाईन आर्टस् : प्रीती भिसे (डीकेएसी, इचलकरंजी), श्रुती माने (महावीर, कोल्हापूर), अवंती पाटील (जयसिंगपूर कॉलेज), मॅनेजमेंट आणि लॉ : श्रावणी गुरव (न्यू कॉलेज), रसिका गायकवाड (विवेकानंद, कोल्हापूर), रामकृष्ण सावंत (तात्यासाहेब कोरे, वारणानगर), मुस्कान सुतार (दत्ताजीराव कदम, इचलकरंजी), आरती नांगरे (शाहू, सरूड), प्युअर सायन्स : अनुराधा बोरनाईक (देवचंद, अर्जुननगर), संचिता शिरवळ (केआयटी, कोल्हापूर), स्वरूपा व्हटकर (वासंतीदेवी फार्मसी, कोल्हापूर), दिव्या बुधवाणी (भारती विद्यापीठ, कोल्हापूर), प्राची मगदूम (न्यू कॉलेज).

ॲग्रीकल्चर ॲनिमल हजबंडरी : रितिका कोंडुसकर (भारती विद्यापीठ), विघ्नेश पाटील (न्यू कॉलेज), धनश्री घाटगे (तात्यासाहेब कोरे), शिल्पा साळोखे (सायबर, कोल्हापूर), स्मिता दुकाने (शाहू, कोल्हापूर), इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजी : दीक्षा घोसरवाडे (न्यू कॉलेज), निखिल पाटील (एसजीएम, महागाव), श्रुती पाटील (सीएमसीव्ही डब्लू, कोल्हापूर), सिद्धार्थ पाटील (केआयटी, कोल्हापूर), सानिया ऊर्फ रसिका शिंदे (न्यू कॉलेज), मेडिसीन आणि फार्मसी : श्रुती किल्लेदार (भारती विद्यापीठ), स्वप्नाली माने (वासंतीदेवी, कोल्हापूर), आफताब गडकरी (राजर्षी शाहू, कोल्हापूर), सायली कागले (भारती विद्यापीठ, कोल्हापूर). स्पर्धेचे परीक्षण डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. अविनाश पाटील, डॉ. संभाजी शिंदे, डॉ. एस. व्ही. चव्हाण, डॉ. आर. एन. नाईक, डॉ. एम. टी. घोपणे, डॉ. डी. एस. भांगे, डॉ. जिनी एस. देशमाने आदींनी केले. डॉ. अशोक मोरमारे, डॉ. श्रद्धा पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. गौरव पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2024
तरूण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ जिल्हास्तरीय अविष्कार स्पर्धेत जनरल चॅम्पियनशिप मिळवलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांबरोबर डॉ. के. जी. पाटील, डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. के. डी. अत्तार, डॉ. डी. जी. गोडसे, डॉ. आर. डी. ढमकले आदी.

# आविष्कार स्पर्धेत न्यू कॉलेज चॅम्पियन

## यशस्वी विद्यार्थ्यांचा प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसतर्फे सत्कार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ व गडहिंग्लज येथील शिवराज महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धा आयोजित केली होती. यात न्यू कॉलेजला जनरल चॅम्पियनशिप देऊन गौरविले. यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन डॉ. के. जी. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांच्या हस्ते केला.

अविष्कार संशोधन स्पर्धेत इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजी विभागातून दिशा घोसरवाडे प्रथम क्रमांक, सानिया शिंदे पाचवा क्रमांक (इलेक्ट्रॉनिक्स विभाग), अॅग्रीकल्चर विभागातून विघ्नेश पाटील द्वितीय क्रमांक (इलेक्ट्रॉनिक्स विभाग), प्युअर सायन्स प्राची मगदूम (इलेक्ट्रॉनिक विभाग) पाचवा क्रमांक, ह्युमेनिटीज मधुन सृष्टी कुरणे (इंग्रजी विभाग) पाचवा क्रमांक, कॉमर्स आणि मॅनेजमेंटमध्ये श्रावणी गुरव प्रथम क्रमांक (संख्याशास्त्र विभाग) या विद्यार्थ्यांनी यश मिळवले. यशस्वी विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे डॉ. के. डी. अत्तार, संख्याशास्त्र विभागाचे डॉ. डी. जी. गोडसे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी उपप्राचार्य डॉ. ढमकले, प्रबंधक कांबळे, डॉ. अर्चना कांबळे (जगतकर), डॉ. सूर्यवंशी, डॉ. कविता गाजरे, डॉ. पवार, प्रा. के. डी. कांबळे, एम. एन. सुतार उपस्थित होते.

13 DEC 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

शिवराज महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ यांच्या वतीने आयोजित 'जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन' स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. जिल्ह्यातील ३९ महाविद्यालयांतून १९९ विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते. अविष्कार संशोधन स्पर्धेतील विजेता न्यू कॉलेज कोल्हापूरला जनरल चॅम्पियनशिप देऊन गौरवण्यात आले

प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांनी स्वागत केले. स्पर्धेत ह्युमॅनिटी, लँग्वेज आणि फाईन आर्टस्-प्रीती भिसे (इचलकरंजी), श्रुती माने (कोल्हापूर), अवंती पाटील (जयसिंगपूर), कॉमर्स, मॅनेजमेंट आणि लॉ- श्रावणी गुरव, रसिका गायकवाड (कोल्हापूर), रामकृष्ण सावंत (वारणानगर), मुस्कान सुतार (इचलकरंजी), आरती नांगरे (सरूड), प्युअर सायन्स-अनुराधा बोरनाईक (अर्जुननगर), संचिता शिरवळ, स्वरूपा व्हटकर, दिव्या बुधवाणी, प्राची मगदूम, अग्रीकल्चर ॲनिमल हजबंडरी-रितिका कोंडुसकर, विग्नेश पाटील (कोल्हापूर), धनश्री घाटगे (वारणानगर), शिल्पा साळोखे, स्मिता दुकाने, इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजी-दीक्षा घोसरवाडे (कोल्हापूर), निखील पाटील (महागाव), श्रुती पाटील, सिद्धार्थ पाटील, सानिया ऊर्फ रसिका शिंदे, मेडिसिन आणि फार्मसी-श्रुती किल्लेदार, स्वप्नाली माने, आफताब गडकरी, सायली कागले (कोल्हापूर) यांनी यश मिळवले. शिवराज विद्या संकुलाचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे, पी. टी. गायकवाड, टी. एम. चौगले, प्रा. बिनादेवी कुराडे, आर. एच. अतिग, डॉ. डी. एच. दगडे, उपाध्यक्ष दिग्विजय कुराडे, डॉ. ए. व्ही. धुळे, डॉ. जे. बी. यादव यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. डॉ. अशोक मोरमारे, डॉ. श्रद्धा पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. गौरव पाटील यांनी आभार मानले.



गडहिंग्लज : आविष्कार संशोधन स्पर्धेतील विजेत्या न्यू कॉलेज कोल्हापूरच्या विद्यार्थ्यांना सन्मानित करताना प्रा. किसन कुराडे यांच्यासह मान्यवर.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2024
तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठ परीक्षेतील १५ विषयांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२४ परीक्षा सुरू आहेत. या परीक्षेतील आत्तापर्यंत १५ विषयांचे निकाल जाहीर झाले आहेत.. गुरूवारी १२१ अभ्यासक्रमांची परीक्षा १८७ केंद्रावर ५० हजार ३७६ विद्यार्थ्यांनी दिली. या परीक्षेत पथकाकडून कोल्हापूर ४, सांगली १ व सातारा ३ तीन जिल्ह्यातून ८ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद झाली आहे. परीक्षा प्रमाद समितीमार्फत संबंधित विद्यार्थ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे. तरी विद्यार्थ्यांनी नियमानुसार कार्यवाही करावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2024
पुढारी

# उल्कावर्षाव पाहण्याची आज खगोलप्रेमींना पर्वणी

कोल्हापूर : जेमिनिडस् उल्कावर्षाव दि.१३ रोजी रात्री दिसणार आहे. ते पाहण्याची खगोलप्रेमींना अनोखी पर्वणी असणार आहे. चंद्रप्रकाशामुळे उल्कावर्षाव दिसण्यात थोडा प्रभाव पडत असला तरीही प्रतितास सुमारे १२० उल्का दिसण्याची शक्यता आहे. शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अंतराळ संशोधन केंद्राने खगोलीय नजाऱ्याचे खुले निरीक्षण रात्री ८ नंतर आयोजित केले आहे. नागरिक, शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी यांनी निरीक्षणात सहभाग घ्यावा, असे आवाहन या केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2024
तरुण भारत

# आज रात्री होणार या वर्षातील सर्वात मोठा उल्कावर्षाव

कोल्हापूर : या वर्षातील सर्वात मोठ्या उल्कावर्षापैकी एक जेमिनिड्स उल्कावर्षाव शुक्रवार १३ डिसेंबर रोजी रात्री होणार आहे. यावर्षी चंद्रप्रकाशामुळे उल्कावर्षाव दिसण्यात थोडासा प्रभाव पडेल. तरीही प्रति तास सुमारे १२० उल्का दिसण्याची शक्यता आहे. शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अंतराळ संशोधन केंद्राने या खगोलीय नजाऱ्याचे खुले निरीक्षण सर्व नागरिक, शाळा–महाविद्यालयातील विद्यार्थी यांच्यासाठी रात्री ८ नंतर आयोजित केले आहे. पन्हाळ्यात प्रदूषण कमी असल्याने आकाश स्पष्ट दिसते. तरी सर्व नागरिक, शाळा–महाविद्यालयातील विद्यार्थी यांनी उल्कावर्षाव पाहण्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी केले आहे.

**▪ विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रातर्फे उल्कावर्षाव पाहण्याची व्यवस्था**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2024
पुढारी

# अधिविभाग सोडून इतरत्र फिरल्यास कर्मचाऱ्यांवर कारवाई; कुलसचिवांचा इशारा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील प्रशासकीय कार्यालयाची दुपारची सुट्टी २ ते २.३० अशी आहे. त्यामुळे संबंधितांनी दोनपूर्वी भोजन करण्यास बसू नये. तसेच २.३० वाजता कार्यालयात उपस्थित राहावे, अशा सूचना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवक यांना एका परिपत्रकाद्वारे दिल्या. कार्यालयीन वेळेत कार्यालयीन कामकाजाव्यतिरिक्त, वरिष्ठांच्या पूर्वपरवानगीशिवाय आपला विभाग सोडून इतरत्र फिरू नये. या नियमांचे पालन न केल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल, असा इशारा दिला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2024

तरूण भारत

# शिक्षक, अधिकारी, कर्मचाऱ्यांनी नियमांचे पालन न केल्यास कारवाई

■ विद्यापीठ प्रशासनाचा परिपत्रकाव्दारे इशारा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवक यांना दुपारी २ ते २.३० या वेळेत जेवणाची सुट्टी असते. त्यामुळे दुपारी २ पूर्वी कार्यालय सोडू नये, अथवा जेवन करण्यास बसू नये. त्याचबरोबर दुपारी २.३० वाजता आपल्या अधिविभागात अथवा कार्यालयात उपस्थित राहाणे बंधनकारक आहे. कार्यालयीन वेळेत इतर ठिकाणी फिरू नये. आपल्या कार्यालयातील वरिष्ठांच्या परवानगीशिवाय कार्यालय, अधिविभाग सोडून जाऊ नये. नियमांचे पालन न केल्यास संबंधितांवर सेवा नियमानुसार कारवाई करण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने एका परिपत्रकाव्दारे केले आहे.

शिवाजी विद्यापीठातील काही प्राध्यापक, समन्वयक, अधिकारी कर्मचारी कार्यालयीन कामकाजाच्यावेळी वैयक्तिक कामे करतात. आपले काम सोडून इतर ठिकाणी गप्पा मारत बसतात. अन्यथा विद्यापीठातील कँटीनमध्येही तासंतास बसलेले असतात. शिवाय जेवनाची सुट्टी होण्यापुर्वीच जेवण करून शतपावले करण्यासाठी विद्यापीठ परिसरात फिरत असतात. काही कर्मचारी तर सकाळी व्यायाम करता येत नाही म्हणून दुपारी आणि सायंकाळी ६ वाजता कार्यालय सुटण्यापुर्वी दुपारी ४.३० किंवा ५ वाजताच विद्यापीठ परिसरात फिरत असतात. परिणामी बाहेरून येणारे प्राध्यापक, प्राचार्य, कर्मचारी, विद्यार्थ्यांचे वेळेत काम होत नसल्याच्या तक्रारी विद्यापीठाकडे लेखी स्वरूपात दाखल झाल्या आहेत. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने लेखी परिपत्रक काढून कार्यालयीन वेळेचे पालन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. नियमांचे पालन न केल्यास कारवाईचा इशाराही दिला आहे.

13 DEC 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कामाव्यतिरिक्त फिराल, तर कारवाई

## विद्यापीठ प्रशासनाचा कर्मचाऱ्यांना इशारा; सर्व विभाग, अधिविभागांना पाठवले परिपत्रक

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १२ : दुपारी दोन ते अडीच या वेळेत जेवण करा. या वेळेपूर्वी अथवा नंतर कामकाजाव्यतिरिक्त आपला विभाग अथवा अधिविभाग सोडून इतर ठिकाणी फिरू नका. याबाबतच्या नियमांचे पालन केले नाही, तर सेवा नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशारा शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने कॅम्पसमधील सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, शिक्षक, कर्मचाऱ्यांना दिला आहे.

### शिस्त लावा; पण प्रश्नही सोडवा

■ कार्यालयीन वेळेच्या नियमाचे पालन बहुतांश कर्मचारी करतात. प्रशासनाच्या या परिपत्रकाची माहिती आमच्या सदस्यांना दिली आहे. प्रशासनाने निश्चितपणे शिस्त लावावी. पण, आमचे प्रलंबित असलेले प्रश्नही तातडीने सोडविण्याची कार्यवाही करावी, अशी मागणी शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी केली.



काही शिक्षक, कर्मचारी दुपारची जेवणाची सुटी संपली तरी कॅम्पसमध्ये फिरतात. ते विभाग, अधिविभागात निर्धारित वेळेत उपस्थित राहत नसल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यावर प्रशासनाने कार्यालयीन वेळेचे पालन करण्याबाबतचे परिपत्रक सर्व विभाग, अधिविभागांना पाठविले आहे.

विद्यापीठ प्रशासकीय कार्यालयाची दुपारी सुटी दोन ते अडीच या वेळेत असल्याने संबंधितांनी दोनपूर्वी कार्यालय सोडू नये अथवा भोजन (जेवण) करण्यास बसू नये. तसेच दुपारी अडीच वाजता आपल्या विभागामध्ये उपस्थित राहावे. कार्यालयीन वेळेत कार्यालयीन कामकाजाव्यतिरिक्त स्वतःचा विभाग सोडून इतर ठिकाणी फिरू नये. वरिष्ठांच्या पूर्वपरवानगीशिवाय कर्तव्याचे ठिकाण सोडण्यात येऊ नये. सर्वांनी कार्यालयीन वेळेचे काटेकोरपणे पालन करून कार्यालयीन कामकाजामध्ये गती आणावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनातर्फे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी परिपत्रकाद्वारे केले आहे.

13 DEC 2024

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वारणेत शिवाजी विद्यापीठ अंतर्गत धनुर्विद्या स्पर्धा

## अनिकेत गावडे, अनघा दिक्षीत,मयुर रोकडे,धनश्री जाधव प्रथम

प्रतिनिधी
वारणानगर

येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविदालयात झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत धनुर्विद्या स्पर्धेत अनिकेत गावडे, अनघा दिक्षीत,मयुर रोकडे,धनश्री जाधव,अजित श्रीराम,प्रांजल वाईकर, एलबीएस सातारा यानी विविध प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला.

धनुर्विद्या स्पर्धेतील विविध प्रकारात निकालात अनुक्रमे विजेते इंडियन प्रकार मुले :अनिकेत गावडे प्रथम,पृथ्वीराज काशीद द्वितीय, अशितोष भोसले तृतीय,अमीत फाळके चतुर्थ, मुली :- अनघा दीक्षित प्रथम,प्राजक्ता सूर्यवंशी द्वितीय, अनुष्का चौधरी तृतीय, रूचिरा भोसले चतुर्थ.

**रिकर्व्ह प्रकार मुले :** मयुर रोकडे प्रथम,साहिल शेलार द्वितीय, आदित्य जाधव तृतीय,प्रणव माळवेकर चतुर्थ, मुली? धनश्री जाधव प्रथम,प्रतीक्षा विरकायडे द्वितीय,ओमश्री नणवरे तृतीय, कंपाऊंड प्रकार मुले :अजित श्रीराम प्रथम,कुणाल फाटक द्वितीय, स्वर रंगवले तृतीय, सिद्धेश निंबाळकर, मुली : प्रांजल वाईकर प्रथम,अपुर्वा चव्हाण द्वितीय,

**धनुर्विद्या स्पर्धेतील चॅम्पियनशिप चषक :** एलबीएस सातारा प्रथम, केवीएम वाई द्वितीय, एम सी फलटन व बळवंत कॉलेज विटा यांना विभागून तृतीय क्रमांक मिळवला. या स्पर्धेतील विजेते खेळाडूंची भुवनेश्वर ओडिसा या ठिकाणी होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर यांच्या वतीने जिल्ह्यात प्रथमच आंतर विभागीय धनुर्विद्या स्पर्धा यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयाच्या शिवनेरी क्रिडांगणावर झाल्या. स्पर्धेचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. व्हि. व्हि. कारजिन्नी व प्राचार्य डॉ. ए. एम. शेख यांच्या हस्ते झाले. यावेळी शिवाजी विद्यापीठ धनुर्विद्या निवड समितीचे चेअरमन डॉ. समीर पवार निवड समितीचे सदस्य डॉ. विक्रांत शिपुगडे व प्रा. शिवाजी दबडे उपस्थित होते. शिवाजी विद्यापीठाचे स्पर्धा निरीक्षक म्हणून डॉ. सुजित शेडगे सर उपस्थित होते. सुत्र संचालन प्रा. नामदेव चोपडे व आभार प्रा. क्रांतीकुमार पाटील यांनी केले.



**वारणानगर : येथे उद्घाटन प्रसंगी डॉ. व्हि. हि. कारजिन्नी, डॉ. ए. एम. शेख, डॉ. समीर पवार, डॉ. विक्रांत शिपुगडे व प्रा. शिवाजी दबडे मुख्य पंच किशोर खिलारे, प्रा. क्रांतीकुमार पाटील, सुहास कंदुरकर, सागर चव्हाण, विशाल पाटील आदी.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ पुरुष व्हॉलीबॉल संघाची निवड



**मुरगूड : पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड झालेला शिवाजी विद्यापीठाचा व्हॉलीबॉल संघ**

**मुरगूड** : कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष व्हॉलीबॉल संघाची निवड झाली असून हा संघ १४ ते १८ डिसेंबर दरम्यान होणऱ्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ व्हॉलीबॉल स्पर्धेत सहभागी होणार आहे. या स्पर्धा स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे होत आहेत. शिवाजी विद्यापीठ संघातील निवड झालेले खेळाडू असे : ओंकार लोकरे, विवेक चौगले, सत्यजित शिंदे (मंडलिक महाविदयालय मुरगूड), विजय खामकर, कृपेश पाटील (दूध साखर महाविद्यालय बिद्री), अथर्व तोडकर, विजय पाटील (डीआर माने महाविद्यालय कागल), सौरभ जगदाळे, धिरज पाटील (एस के पाटील महाविद्यालय कुरुंदवाड), विश्वरुप पाटील, आदित्य सदामते (केबीपी कॉलेज इस्लामपूर), अभिजीत कांबळे (अण्णासाहेब डांगे महाविद्यालय हातकणंगले), अमन नायकवडे (देवचंद कॉलेज अर्जुन नगर), ऋषीकेश ठमके (विवेकानंद कॉलेज कोल्हापूर) या स्पर्धेसाठी संघाबरोबर प्रशिक्षक संदीप पाटील, सहा. प्रशिक्षक तथा व्यवस्थापक डॉ .सुनील चव्हाण जात आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2024
सकाळ

# विद्यापीठाच्या परीक्षेत कोरे फार्मसीचे यश

वारणानगर, ता. १२ : येथील तात्यासाहेब कोरे फार्मसी कॉलेजने शिवाजी विद्यापीठाच्या सन-२०२३-२४ च्या पदवी व पदव्युत्तर परीक्षेत गुणवत्ता यादीत पहिल्या दहामध्ये महाविद्यालयाच्या चार विद्यार्थिनींनी स्थान पटकविले.

कशिश मुल्ला, सायली दिंडे, रेवती चव्हाण, किरण मिसाळ यांनी अनुक्रमे विद्यापीठात पाचवा, सहावा, आठवा व नववा क्रमांक पटकावला. या यशामागे महाविद्यालयामधील उत्कृष्ट अध्यापन, स्वयंअध्ययन आणि विद्यार्थीभिमुख प्रशासनपद्धती यामुळेच यश प्राप्त झाल्याचे प्राचार्य डॉ. किरण पाटील यांनी सांगितले.

विद्यार्थिनींना डॉ. कल्पना पाटील, परीक्षा विभागप्रमुख प्रा. सुनीता शिंदे आणि सर्व प्राध्यापकांचे यांचे मार्गदर्शन लाभले. वारणा विभाग शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रो. डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन व कौतुक केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2024
तरूण भारत

# ऑल इंडिया रग्बी स्पर्धेसाठी निहाल ताशिलदारची निवड

**कसबा तारळे :** कसबा तारळे येथील निहाल जैनूल ताशिलदार याची चंदीगड येथे होणाऱ्या



ऑल इंडिया रग्बी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघात निवड झाली आहे .तो देवचंद कॉलेज अर्जुन नगर निपाणीचा विद्यार्थी असून त्याला क्रीडा शिक्षक रवी चव्हाण, वडील जैनूल ताशिलदार यांचे मार्गदर्शन लाभले.

13 DEC 2024 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आवडीच्या, दुर्मीळ पुस्तकाची नोंद करा विश्वविक्रमात

## पुस्तक महोत्सवांतर्गत 'सकाळ'चा उपक्रम; शहरासह जिल्ह्यातील शाळांमधील विद्यार्थी होणार सहभागी

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १२ : आपल्या आवडीच्या किंवा आपल्याकडील दुर्मीळ पुस्तकाची नोंद 'सर्वात मोठा पुस्तकांच्या छायाचित्रांचा ऑनलाइन अल्बम' या विश्वविक्रमात व्हावी, यासाठी आता शाळा पुढाकार घेत आहेत. पुणे पुस्तक महोत्सवांतर्गत 'सकाळ'च्या वतीने आयोजित या विश्वविक्रमाच्या उपक्रमात शहरासह जिल्ह्यातील शाळांमधील लाखो विद्यार्थीही सहभागी होणार आहेत.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने शनिवारपासून (ता. १४ डिसेंबर) पुणे पुस्तक महोत्सव फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर भरविला आहे. महोत्सवाचे औचित्य साधून 'सकाळ'च्या वतीने हा विश्वविक्रम करण्यात येणार आहे. याद्वारे जवळपास २५ लाख वाचकांपर्यंत पोचण्याचा मानस आहे. विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी आणि वाचन संस्कृती अधिक वाढावी, यासाठी शाळा या विश्वविक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी होण्यासाठी सकारात्मक पाऊल पुढे टाकत आहेत.

### तुम्हीही व्हा सहभागी

■ क्यूआर कोड स्कॅन करा किंवा लिंकवर क्लिक करा. तुमच्या पुस्तकाच्या मुखपृष्ठाचे छायाचित्र अपलोड करा. एकावेळी एकाच पुस्तकाच्या मुखपृष्ठाचे छायाचित्र दिसेल. जास्त पुस्तके असल्यास प्रत्येक मुखपृष्ठाचे वेगवेगळे छायाचित्र अपलोड करा.

■ लिंक : https://photoupload.pbf24.in



“ पुस्तक वाचन ही एक आनंददायी प्रक्रिया आहे. पुस्तक वाचनाने वैचारिक प्रगल्भता लाभते. 'सकाळ'चा प्रस्तुत उपक्रम हा वाचन चळवळीला चालना देणारा तर आहेच; त्याचबरोबर अत्यंत दुर्मिळ अशा पुस्तकांची प्राथमिक ओळख करून देणारा आहे. एकविसाव्या शतकातील तरुण पिढीला आपली प्रगल्भ वाचनाची दिशा ठरविण्यासाठी या उपक्रमाचा निश्चित लाभ होईल, अशी आशा आहे.

**- डॉ. डी. टी. शिर्के,**
कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ